
## गीतांजली भोसले

# माया



# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# माया

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# माया

गीतांजली भोसले

# माया


लेखिका : गीतांजली भोसले.

७२१८८५११०२

इमेल: geetanjali.b@yahoo.com

quicksilver016@gmail.com

Blog: https://geetanjalidream.blogspot.com



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction. damages and accounts

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : २८ जुलै २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# गीतांजली भोसले



मी गीतांजली विश्वनाथ भोसले, कुपवाड सांगली येथे राहते. माझे शिक्षण MCA (दूरस्थ), PGDCA, B.Sc. (Micro) असे झालेले असून सध्या छोटासा उद्योग आहे.

Quicksilver IT Services, Kupwad या व्यवसायातून net café, data entry, typing and typesetting of books/magazines/class notes, etc., Computer training, Academic classes, xerox, lamination हे सर्विसेस दिले जातात. याशिवाय Happy Shopping Mart नावाची छोटीशी शॉपी आहे जिथे लोणची, पापड, मसाले, शेवया, तसेच प्लास्टिकच्या वस्तू, खेळणी वगैरे विविध वस्तूची विक्री उपलब्ध आहे.

मला वाचनाची आवड आहे. ई-साहित्य वरील बरीच पुस्तके मी नेहमी वाचत असते. खूप चांगल्या प्रकारची पुस्तके तिथे

उपलब्ध आहेत. ई-साहित्य वर या आधी ‘स्मृती दिवाळी अंक’ प्रकाशित केला होता. त्यासाठी मला चांगला प्रतिसाद मिळाला.

एक छोटीशी काल्पनिक कथा सुचली, ती लिहिली आणि ब्लॉग वर पोस्ट केली. त्यात काही बदल करून तीच कथा पुस्तक स्वरूपात ई-साहित्य दालनात जमा करत आहे.

आपल्याला ही कथा कशी वाटली जरूर कळवा.

धन्यवाद.

गीतांजली भोसले.

७२१८८५११०२

इमेल: geetanjali.b@yahoo.com

quicksilver016@gmail.com

Blog: https://geetanjalidream.blogspot.com

# प्रस्तावना

खरं तर ही एक छोटीशी काल्पनिक कथा आहे. कल्पनारम्य दुनियेत जगायला कोणाला आवडत नाही. आपल्या नेहमीच्या धकाधकीच्या जीवनातून थोडा विसावा, थोडी उसंत मिळालीच तर आणि करण्यासारखं काहीही काम उरलं नसेल तेव्हा आपण कल्पनाविलासात रंगून जातो. आपल्या थकलेल्या मनाला तेवढाच दिलासा. बरेचदा आपली स्वप्न जी आपण अजूनही पूर्ण करू शकलो नाही, किंवा भविष्यात पूर्ण करण्याचा विचार करत असतो ती स्वप्न आपल्या मनात सतत घोळत असतात. आणि मध्येच काही चमत्कारिक विचार आपल्या मनात चमकून जातात. या कथेद्वारे आपण एका काल्पनिक दुनियेची सफर करणार आहात जी आपल्यामनाला अधिक आनंदी करून जाते. जीवनातील अनंत अडचणी, तेच तेच टेन्शन आणि आजूबाजूचा तोच तो दररोज दिसणारा परिसर या पलीकडे आपण काही चमत्कारिक, अद्भुतरम्य अशा दुनियेत विसावा घेऊया.

ही सफर तुम्हाला कशी वाटली हे जरूर कळवा.

गीतांजली भोसले. ७२१८८५११०२

इमेल: geetanjali.b@yahoo.com

# अर्पणपत्रिका

माझी पहिली वाचक आणि माझ्या जीवनातील प्रत्येक वळणावर मला साथ देणारी माझी जीवश्च कंठश्च मुलगी नेहा

माझ्यातील लेखिकेला वाव देणारी ई-साहित्य प्रतिष्ठान ही संस्था

माझ्या पाठीशी सावलीप्रमाणे उभी असणारी अर्थातच माझी आई

यांना हे पुस्तक समर्पित करीत आहे.

- गीतांजली भोसले

# माया

सदरील कथा काल्पनिक असून कथेतील नावं, स्थळं आणि पात्रं हे देखील काल्पनिक आहेत. या कथेतील नावे आणि पात्रे वास्तवातील कोणाशी जुळत असतील तर तो निव्वळ योगायोग समजावा.

The gift of fantasy has meant more to me than my talent for absorbing positive knowledge.
**Albert Einstein**

# १.

न म स्काSSSर मित्र मैत्रिणींनो, मी 'आर.जे. माया' तुमच्यासोबत. आपण ऐकत आहात रेडिओ एफ.एम. 'माझी दुनिया' ९९९.९९ वर. तर मित्रांनो, मी आज आपणास सांगू इच्छिते की, आता सकाळचे सहा वाजलेत आणि आपण सर्व जण खूपच आनंदी आहोत याचं कारण आहे मित्रांनो, आजची ताजी हवा. आजचा दिवस खूप खास आहे कारण आजचं हे सकाळच वातावरण खूपच छान आहे. मस्त आल्हाददायक हवा, कोवळ ऊन, आणि गॅलरीत बसून घेतलेला गरम गरम चहा... अहाहा! वाह क्या बात है! तुम्हाला सांगते दोस्तहो, आज असं वाटत आहे की आपण मस्तपैकी एका डोंगरावर बसलो आहोत. आजूबाजूला खूप सुंदर सुंदर फळाफुलांनी लगडलेल्या वेली, रोपं आणि मोठी मोठी झाडं आहेत. त्या फुलांचा मस्त सुगंध दरवळत आहे. अहाहा! त्यातच शेजारी असलेल्या धबधब्याचं पाणी वरून लयबद्ध आवाज करत कोसळत आहे आणि एखाद्या खोडकर मुलाप्रमाणे त्याचे काही थेंब तो आपल्या अंगावर उडवत आहे. मधुर, शुभ्र असं पाणी खळाळत वहात आहे. पक्षी गुणगुणत आहेत. फुलपाखरे

इकडून तिकडे फिरत आहेत. हळूच आपल्या अंगावर बसून उडून जात आहेत. आकाश जणू काही धरतीला मिठीत घेत आहे. नभ खाली उतरून आलंय. इतकं सुंदर मनमोहक दृश्य पाहून आपण सगळेच हरखून गेलोय.

आपण आपल्या परिवारासोबत अगदी शांतपणे या निसर्गाचा आस्वाद घेत बसलोय. असे अनेक परिवार आपल्या आजूबाजूला आहेत. लहानांपासून मोठ्यांपर्यंत, तरुणांपासून वृद्धांपर्यंत सर्वजण इथे आहेत. कोणी आपल्या प्रियकरासोबत तर कोणी आपल्या नवऱ्यासोबत, कोणी मुलांबरोबर तर कोणी आपल्या आई-वडिलांसोबत इथे बसलंय. ओह हो! इथे काही तरूण मित्रमैत्रिणींचा ग्रुपही आहे. छोट्यांची फौज आहे. आपल्या आईच्या कुशीत विसावलेलं इवलंस लेकरू आहे. पण नेहमीसारखा गलका आज इथे नाहीये. कारण निसर्गाचा जादुई आवाज ऐकण्याच्या नादात कोणालाही बोलायची अजिबात इच्छा होत नाही.

सर्वजण अधीरपणे आपल्या हृदयात या सुंदर, मनमोहक सकाळचा प्रत्येक क्षण साठवून ठेवत आहे. आणि हे काय? किती सुंदर आवाज आहे हा! लतादीदींचा दिसतोय. इथे लतादीदीही आल्यात की काय? अहं आर.जे. माया ने आपल्यासाठी खास

आपल्या आवडत्या गायिकेच गाणं लावलेलं आहे. प्रत्येक जण आपापल्या आवडीची धून मनातल्या मनात हळूवारपणे गुणगुणत आहे. आपण सर्वजण जणू स्वर्गातच असल्याचा भास होत आहे. निसर्गानं आपल्यासाठी याच धरतीवर हा स्वर्गच तर बनवलाय. खास आपल्या विसाव्यासाठी. चला तर मग जगूयात हा आनंदी क्षण! ☺



इंद्रधनुचे रंग बघ हे साद घाली मना

रंग उधळूनी, भाव उधळूनी दे आकाशी मना

गूंज ऐकू दे मज खेळू दे या पवनासंगे
दूर दूर मज उगा फिरू दे या वाऱ्यासंगे
तोडूनी रित, ही प्रित मज प्यारी
तिच्या कवे निजू दे, निसर्गा तुझ्या कवे बसु दे
मज आनंदी बनू दे, मज स्वच्छंदी बनू दे
मज आनंदी बनू दे, मज स्वच्छंदी बनू दे
मज आनंदी बनू दे, मज स्वच्छंदी बनू दे

# २.

Welcome back dear all friends!!! आपण ऐकत आहात रेडिओ एफ.एम. ‘माझी दुनिया’ ९९९.९९ वर आपल्या खास मैत्रिणीसोबत आर. जे. माया. बघता बघता वेळ कसा गेला कळलच नाही नई. छान होती ती दुनिया ज्यामध्ये आपण सर्वच जण अगदी रंगून गेलो होतो. मला वाटतं असं रोजच्या धकाधकी जीवनातून एक अशी रम्य, निवांत सकाळ मिळावी.

आज तशी सुट्टी आहे, नाही का? आज रविवार. मग काय Sunday special काही आहे की नाही तुमच्याकडे? ओ हो काय म्हणालात? आहे! वाह वा! माझ्याकडे ही आहे Sunday special. खास तुमच्या सर्वांसाठी. एक surprise आहे. ओळखा पाहू काय असेल? अ? गाणी? अं हं ! मग नाटक? मुळीच नाही! मुलाखत? हॅ! मग गोष्ट? छॅ! अरे मग काय???

It’s secret.

आज बरोबर ९ वाजता सर्वांनी तयार राहायचं. अगदी जेवण, नाश्ता, चहा पाणी, अंघोळ, वगैरे वगैरे सर्व काही उरकून तयार. OK. आज तुम्ही सगळे फ्री आहात. कोणालाही कोणतही दुसरं काम नाहीये. कोणीही कुठेही जाणार नाहीये. right? तर अशा

सर्व रिकामटेकड्या (आजच्या दिवसापुरते) लोकांसाठी काही तरी खास मी सांगणार आहे. बरोबर ९ वाजता. तर आता कुठेही गेलात तरी चालेल, काहीही केलत तरी चालेल, पण बरोबर ९ वाजता रेडीओ ट्यून करायला विसरू नका रेडीओ एफ.एम. ‘माझी दुनिया ९९९.९९ वर.

...

हॅलो मित्रांनो ! माझ्या खास खास खास अशा सर्व दोस्तांच स्वागत आहे. आपण बरोबर ९ वाजता माझ्यासोबत परत आलात याबद्दल खूप खूप खूप धन्यवाद. आणि मी आता तुम्हाला एक सरप्राईज देणार आहे. आज माझ्यासोबत आहेत आपल्या सर्वांचा लाडका जादुगार ‘मिस्टर आकाश’ आणि त्यांच्यासोबत त्यांची मैत्रीण आणि सहचारिणी ‘मिस अवनी’. आता तुम्ही म्हणाल, छे! हे असं कधी असतं का? जादू ही डोळ्यांनी पाहाण्यासाठी असते.

आजपर्यंत कधीतरी जादूचे प्रयोग असे ऑडीओ झालेत का? काहीही हा!!! ही माया काय डोस्क्यावर पडली-बिडली तर नाय ना??? काय वाट्टेल ते! आम्ही आपलं सगळं आवरून अगदी छान एफ एम सुरु केला म्हटलं काही तरी मस्त सरप्राईज मिळेल आणि मायाने आमचा सगळा निरस केला. छे!!!

ओ हो हो थांबा, जरा थांबा!!! आधी ऐका तर माझं. तुमचा माझ्यावर विश्वास आहे की नाही? मी तुम्हाला अजिबात निराश करणार नाही. जादुगार आकाश आणि अवनी आज काही खास प्रयोग आपल्यासाठी सादर करणार आहेत. अर्थातच ऑडीओ. ही दोघे आपल्या सर्वांना 'माया'ज् वर्ल्ड' मध्ये घेऊन जाणार आहेत. मी काही सांगण्यापेक्षा तुम्ही ऐकाच. मला खात्री आहे तुम्हाला नक्की आवडेल. चला तर मग जोरदार टाळ्यांनी स्वागत करूयात आपले सर्वांचे लाडके 'वर्ल्ड फेमस जादुगार 'मिस्टर आकाश' आणि त्याची मैत्रीण 'मिस अवनी' यांचं.

# ३

.

**आकाश:** सर्व प्रेक्षकांना माझा सप्रेम नमस्कार. मी जादुगार आकाश आपल्या सर्वांचं स्वागत करत आहे आपल्या अनोख्या कार्यक्रमात 'मायाज् वर्ल्ड' मध्ये. आज आपण एका वेगळ्या दुनियेत प्रवास करणार आहोत. एक अनोखी दुनिया जी यापूर्वी ना तुम्ही कधी पाहिली ना कधी ऐकली. तुम्ही सर्वजण खूप कंटाळला असाल. सतत काम करणाऱ्यांना घरात बसणे ही फार मोठी शिक्षा वाटते आणि आपल्या बालचमूंना तर घर म्हणजे एक तुरुंग वाटतो. घरातली माणसं इकडं तिकडं गेली की गृहिणीही सुटकेचा निश्वास टाकतात. कारण उरलेली कामं त्या निवांतपणे, मागे कुणाची किटकट नसताना उरकू शकतात. आजकालच्या तरुणाईला तसा मोबाईल जवळचा आहे, पण मित्रांच्या घोळक्यात गेल्या शिवाय दिवस सरत नाही. अशातच कोरोनाच संकट, लॉकडाऊन, चक्रीवादळ, पूर अशा सर्वांनी आपली मन:स्थिती अगदी खचून गेलेली आहे आणि अशावेळी आपल्या मनात एक विचार नक्की येतो तो म्हणजे हे सगळं सोडून दूर कुठेतरी निघून जावं. निवांत. आज मी तुमची ही इच्छा पूर्ण करणार आहे. तुम्हाला

मी माया’ज वर्ल्ड मध्ये नेणार आहे. याचं कारण असं की लॉकडाऊन मुळे सध्या आपण या देशातून त्या देशात सोडा पण या जिल्ह्यातून त्या जिल्ह्यात सुद्धा जाऊ शकत नाही मग प्रवासाची गोष्ट लांबच राहिली. अशावेळी मायाज् वर्ल्ड ची ही सफर तुम्हाला सुखाऊन जाईल.

मला आता एका स्वयंसेवकाची गरज आहे. आपलं एफ एम ‘माझी दुनिया’ ऐकणारे चाहते मला ८९XXXXXX०२ या नंबर वर संपर्क करतील. ज्या व्यक्तीचा कॉल पहिल्यांदा उचलला जाईल त्या व्यक्तीला ही संधी मिळेल. चला तर मग सुरु करूया ही सफर. मी नंबर पुन्हा एकदा रिपीट करते. ८९XXXXXX०२.

ट्रिंग… ट्रिंग….ट्रिंग….

हॅलो (तिकडून आवाज)

हॅलो, मी स्वाती बोलतेय. आपण जादुगार आकाश का? माया’ज वर्ल्ड कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी मी हा कॉल केला आहे.

हॅलो… हो, हो. मीच बोलतोय. आपला पहिला कॉल मी उचलला आहे. आपलं हार्दीक अभिनंदन.

माया’ज वर्ल्ड मध्ये जाण्यासाठी आपण उत्सुक आहात काय?

(तिकडून आवाज) हो, हो. मिस्टर आकाश मी खूप खूप उत्सुक आहे.

कृपया मला आपण आपला थोडक्यात परिचय करून द्याल का? इति आकाश.

हो देईन की. माझं नाव स्वाती. मी कुपवाड, सांगली येथे राहते. माझं प्रोफेशन नर्स असं आहे. सध्या मी कोरोना बाधित असल्याने home quarantine आहे. माझी तब्बेत आता एकदम ठणठणीत आहे आणि एक-दोन दिवसात पुन्हा माझं रुटीन सुरु करू शकेन. इति स्वाती.

आकाश: ओ हो. अभिनंदन. आपण कोरोना विरुद्धची लढाई जिंकलेली आहे. तुमच्या बोलण्यावरून मला एक नक्की दिसतय की, तुम्ही खूपच सकारात्मक विचारांच्या आहात. आपण या कार्यक्रमातील पहिले स्वयंसेवक असल्याने मी एक गिफ्ट तुमच्यासाठी देत आहे. ते आपण रेडीओ एफ.एम. आपली दुनिया यांच्याकडून जरूर collect करा.

स्वाती: धन्यवाद.

आकाश: चला तर मग आपण आपल्या प्रवासाची तयारी करूयात. या अनोख्या आणि जबरदस्त प्रवासाला जाताना आपण कोणता पेहेराव कराल?

स्वाती: सर आम्ही दिवसभर नर्सच्या गणवेषात असतो. कोणताही साजशृंगार आम्हाला करता येत नाही. हातात साधी बांगडीही घालता येत नाही. तर या विशेष सफरीसाठी आमच्या घरात लक्ष्मी नारायणाचा एक फोटो आहे. त्यातील लक्ष्मीचा जसा पेहेराव आहे तसा पेहेराव मला करायचा आहे. सुंदर जरीची साडी, उत्तम आभूषणं. अहाहा काय तिचं ते रूप. मला त्या रुपात / पेहेरावात यायचं आहे.

आकाश: ग्रेट. ठरलं तर मग लवकर तयार व्हा. (जादुगार आकाशच्या हिप्नॉटिझमने हा चमत्कार होतो आणि स्वाती स्वत:ला आपण साक्षात लक्ष्मीच्या पेहेरावात आहोत अशा आविर्भावात सामोरी येते.)

स्वाती: ओके सर, मी तयार आहे.

आकाश: वाह वा. स्वाती तुम्ही खूप सुंदर दिसत आहात. आता तुम्हाला या प्रवासाला जाण्यासाठी कोणतं वाहन हवं? तुमच्याजवळ काही पर्याय आहेत. चालत, सायकलने, घोड्यावरून, तुमची आवडती कोणतीही दुचाकी किंवा चारचाकी (कार किंवा बाईक.)

स्वाती: मला घोड्यावरून प्रवास करायचा आहे सर.

आकाश: ओ हो.. झांसीकी रानी.... ओ.के. दिला... घोडा तुमच्या प्रवासासाठी तयार आहे. पण मला फक्त एक शंका आहे ती विचारू का?

स्वाती: हो विचारा ना.

आकाश: इतका सुंदर पेहेराव आणि वाहन जांबाज घोडा का?

स्वाती: सर, स्त्रीला सजण्या नटण्याची नेहमीच आवड असते. पण प्रसंगी ती रणरागिणीचंही रूप धारण करू शकते. त्याचं प्रतिक हा घोडा आहे. दुसरं असं की, चालत, सायकलने, कारने प्रवास केलेला आहे. पण घोड्यावरून प्रवास करून मला ही सफर यादगार बनवायची आहे. कधीही न अनुभवलेला थरार अनुभवायचा आहे. शिवाय माझा प्रवास हा एकटीचा आहे. मला हा घोडा सोबतही करेल. त्याला जीव लावला की तो मला संपूर्ण प्रवासात साथ देईल. मी जर कार, किंवा बाईक घेतली तर त्याचं पेट्रोल संपण, ती खराब होणं या सर्व गोष्टी आल्या. घोड्याला मात्र पोटभर खायला आणि थोडी विश्रांती द्यावी लागेल बस. आमचा सहप्रवास खूप मजेशीर होईल. त्याच्याशी मला गप्पा मारता येतील. असं बरंच काही.

आकाश: खूपच छान कल्पना आहे. काही क्षणातच किती विचार केलात तुम्ही? या दरम्यान लवकर पोहोचणं हा विचार नाही तर सफर आनंदी होणं हा विचार केलात तुम्ही. हा.. मात्र घोड्याचे नखरेही तुम्हाला सांभाळावे लागतील.

स्वाती: हा हा हा (हसते)... घरातल्या सर्वांचे, पेशंटचे, डॉक्टरांचे, व इतर सर्व तऱ्हेवाईक लोकांचे नखरे सांभाळून सवय झाली आहे.

आकाश: स्वाती, तुम्हाला हा प्रवास एकट्यानेच करायचा आहे. हो पण जिथे जिथे तुम्हाला अडचण येईल तिथे तिथे अगदी त्या क्षणी तुम्हाला अवनी मदत करेल. अवनी तुमच्या सोबत नसली तरी ती तुम्हाला न जाणवता तुमच्या आसपास असणार आहे. तुम्ही तुमच्याजवळ कोणतही सामान घ्यायचं नाही. जेवण, पाणी, कपडे, पैसे काहीच न्यायचं नाही. तुम्हाला काही शंका असतील तर विचारा.

स्वाती: मी जर जवळ बॅग घेतली नाही तर कसं चालेल? प्यायला पाणी लागणार, मला भूक लागेल, कुठेतरी विसाव्यासाठी थांबावं लागेल. कदाचित माझी तब्बेत बिघडू शकेल तर प्रवासात मला थोड्याफार औषधांची गरज लागेल आणि या सर्वांसाठी पैसे लागतील.

आकाश: स्वाती, तुम्ही अगदी निश्चिंत रहा. तुम्हाला या कोणत्याही भौतिक वस्तूंची गरज लागणार नाही आणि समजा काही वाटलंच तर अवनीला हाक मारा. ती तुमच्यासमोर लगेच प्रकट होईल. चला तर प्रवासाला सुरु करूयात.

# ४.

मी दार उघडलं आणि बाहेर एक रुबाबदार पांढरा घोडा अगदी ऐटीत उभा होता. मी खूप खुश होते. खरं तर माझ्या कुटुंबासोबत ही सफर असती तर आणखी छान वाटलं असतं. पण समोर तो रुबाबदार घोडा बघून मी सर्व काही विसरून गेले आणि प्रवासासाठी तयार झाले. जवळ कोणतंच सामान नव्हतं. अगदी माझा मोबाईलही माझ्याबरोबर नव्हता. मी अगदी महाराणीच्या थाटात येऊन घोड्यावर स्वार झाले. त्याचं नाव पवन. वाऱ्याच्या वेगाने धावतो म्हणून हे नाव ठेवलं असावं तर... पवनने आपली दौड दिमाखात सुरु केली. सुरुवातीला त्याचा वेग फार होता. रस्त्याने दिसणारे अपार्टमेंट, बंगले, घरं, मार्केट, काही छोटी दुकानं, भाजी मंडई हे सर्व आम्ही काही क्षणातच पार केलं. त्याचा वेग इतका होता की जाता जाता काही भाजी आणि फळ घ्यायचा नेहमीचा मोह मला आवरावा लागला. आमचे ‘हे’ असते ना तर भांडून भांडून त्यांना गाडी थांबवायला लावली असती.

माझ्या मनात चटकन एक विचार आला. या पवनशी आपल्याला दोस्ती करावी लागेल नाहीतर काही खरं नाही. त्याला

राग-बिग आला तर? तो मला धाडकन खाली आपटेल. मनात एकदम धस्स झालं. मी हळूच त्याच्या चेहऱ्याकडे पाहिलं. म्हटलं जरा मूड पाहून दोस्ती करावी. पाहते तर काय... स्वारीचा चेहरा अगदी शांत होता. ना कुठे पोहोचायची गडबड ना आळस. तो आपल्या तालात चालला होता. टप.. टप.. टप... मला एकदम माझ्या लहानपणीची आठवण झाली. माझे बाबा, काका, मामा, कोणी ना कोणी मला 'घोडा.. घोडा..' खेळवण्यासाठी (लहान मुले काका मामा किंवा बाबा यांच्या पाठीवर बसतात व ते रांगत रांगत सगळ्या घरभर फिरतात) फार उत्सुक असायचे. मी त्यांच्या पाठीवर बसून त्यांना जोरजोरात बुक्क्या मारायचे आणि चल रे घोड्या टुगडूक टुगडूक... आणि माझे बाबा, काका, मामा वगैरे सगळी मंडळी अगदी आनंदाने मला घरभर फिरवायचे. एक लाकडी पुढे मागे हलणारा घोडा सुद्धा मला आणला होता. मी तो जोरजोरात हलवायचे आणि म्हणायचे, मला खूप दूर जायचंय. मामाच्या गावाला जायचंय. मी आता भरभर जाते... असं भरभर जाऊन धाडकन तोंडावर आपटले आणि तेव्हापासून माझं घोड्यावर बसणं संपल ते आजतागायत मी कधीही खऱ्या किंवा खोट्या घोड्यावर बसले नव्हते. आज मात्र मला खूप गंमत वाटत होती.

आता शहरी परिसर मागे टाकून आम्ही घरापासून खूप दूर आलो होतो. पवनचा वेग आता थोडा कमी झाला. तर लगेच माझ्यातली गृहिणी जागृत झाली. “अरे लगेच दमून कसं चालेल आपल्याला लवकर पोहोचलं पाहिजे ना. चल न लवकर चल. पळ लवकर” असं म्हणत मी त्याची दोरी - लगाम खेचू लागले. मात्र त्याने टाकलेला एकच तिरका कटाक्ष मला घायाळ करून गेला. मी जाम टरकले. मग हळूच म्हणाले, “नाही, नाही.. काही घाई नाही. तू.. तू चाल निवांत.” असे म्हणत आजूबाजूला नजर टाकली. आणि मी हरखूनच गेले.

एका छानशा बागेजवळ आम्ही आलो होतो. तिथे जवळच एक सुंदरसा झरा होता. पवन थोडासा खाली वाकला मला काही कळेना. मग तो अजून थोडा खाली वाकल्यावर मला समजलं की आता आपल्याला इथे उतरायचं आहे. खाली उतरताच माझ्या पायांना मऊ मखमली, लुसलुशीत गवत जाणवलं. मी त्यावरून पुढे जात राहिले. मला कशाचंच भान राहिलं नाही. जशी जशी मी पुढे जाईन तसे तसे काही फुलांचे ताटवे दिसले. अशी फुलं मी कधीच पाहिली नव्हती. माझ्या माहितीतील फुलांपैकी एकही फूल हे नव्हतं. पण त्यांचा रंग, गंध, मनाला मोहून टाकणारा होता. मी एक एक फुलांना स्पर्श करत गेले. तसा त्याचा सुगंध माझ्या रोमारोमात भिनला. मला आठवण झाली ती माझ्या आवडत्या

पारिजातकाची. पारिजातकाचा मंद सुगंध मला नेहमीच भुरळ घालतो. पहाटेच्या वेळी प्राजक्ताचा सडा आणि त्यांचा सुवास लुटत लुटत फुलं वेचण्याची माझी याही वयात चाललेली बालक्रीडा पाहून तो पारिजातक मला नक्की हसत असावा. खरी मजा येते ती फुलं खाली पडावी म्हणून त्याची फांदी मी जोरजोरात हलवायचे आणि माझ्या अंगावर जणू वर्षाव व्हावा तसा फुलांचा वर्षाव होतो. मग अजूनच नाजूकपणे ती फुलं आपल्या ओंजळीत घेऊन उत्कटतेने त्याचा सुवास घेत राहावं अजून अजून तो सुवास घेतच राहावं असं वाटतं. चाफा, मोगरा, रातराणी ही फुलं देखील मला अशीच भुरळ घालतात.

त्यानंतर माझे लक्ष एका झुल्याकडे गेले. तो आपण बागेत बघतो तसा झोपाळा नव्हता. तर एका वेलीने या वृक्षावरून त्या वृक्षाकडे केलेला प्रवास होता. वेलही खूप मजबूत होती. तिला सुंदर छोटी छोटी लाल फुलं लागली होती. वेलीची पानं काहीशी जांभळट रंगाची होती. त्या वेलीवर आपण सहजपणे बसू शकतो इतकी मजबूत ती वेल होती. मी हळूहळू पण जरा घाबरतच बसायचा प्रयत्न केला. अरे वाह!... मस्त! मी त्या वेलीवर बसले देखील आणि एक सुंदरशी वाऱ्याची झुळूक आली आणि आम्हाला हलवून गेली. हा.. हा.. हा... वाऱ्याने मला झोका दिला. मला आठवलं आम्ही (म्हणजे मी आणि माझ्या बहिणी, माझ्या

काही मैत्रिणी सर्व मिळून) प्रतापसिंह उद्यानात जायचो तेव्हा किती भांडायचो. मी आधी बसणार, मी आधी बसणार. खूप उंच उंच झोके घेत होतो आम्ही. खूप मजा यायची.



या वेलीवरच्या झोक्याने ते दिवस आठवले. खरंच.. माझ्यासारखी मीच भाग्यवान. मला आज हे पुन्हा अनुभवायला मिळालं. असंच इकडे तिकडे नजर गेली तेव्हा दिसलं की इथे खूप खूप वेगवेगळ्या प्रकारची झाडं आहेत. फुलं, फळं आहेत. पाण्याचा खळखळ आवाज आला तर तिथे एक झरा ही वाहत

होता. मी माझ्याही नकळतपणे इथली फळं खाल्ली. खूप गोड होती यार... यम्मी टेस्टी... थोडं पाणीही प्यायले. थंड गार व गोड पाणी. मग विचार आला. इथं कोणीच कसं नाही? अगदी निशब्द शांतता दिसतेय. बरं इथे कोणीही नसताना बगीचा इतका स्वच्छ कसा? झाडांना पाणी कोण देत असेल. इथली फळं फुलं काढून कोण विकायला नेत असेल का? झऱ्याचं पाणी कोणी बिसलरीमध्ये भरून विकत असेल काय? पण नाही... इथल्या कोणत्याही वस्तूला मानवी स्पर्श नव्हता. म्हणजे झाडं कोणी वाढवत नव्हतं. ते वाढत होते. इथं निसर्गच त्या सर्वांची काळजी घेत होता आणि म्हणूनच फळं, फुलं, झाडं ही सर्व अबाधित राहिली होती. वाढत होती. हा बागेचा परिसर खूप खूप मोठा होता. कारण जिथे नजर जाईल तिथे सगळीकडे मला ही बाग दिसत होती.

इथल्या परिसरात एक प्रकारची शांतता होती. ही भयाण शांतता नसून मनाला अगदी खोलवर शांत करणारी होती. माझं मन इथे अगदी हलकं व्हायला लागलं. मनातील सर्व भावना शांत झाल्या. मन अगदी शांत झालं. इथे मला कोणतेही प्राणी दिसले नाहीत. ते या बागेत नव्हतेच की आणखी आतल्या बाजूला झाडीत लपून बसले होते देव जाणे.. पण म्हणूनच कदाचित मला कोणाचं भय इथे वाटलं नाही. माझं पोट भरलं होतं. पाणीही पिऊन झालं होतं. आता मला थोडी डुलकी लागतेय की काय? इथेच

आपल्याला झोप लागतेय की काय असं वाटलं तोच समोर माझा घोडा पवन इथे आला. तो ही भरपेट खाऊन पिऊन आलेला दिसतोय. माझ्या समोर हळूच वाकून बसला. मी अलगद घोड्यावर स्वार झाले आणि आमचा पुढचा प्रवास सुरु झाला.



# ५.

आता पुन्हा एकदा पवनचा वेग वाढला होता. तसाच माझ्या विचारांचाही. आपण कोणाला विचारून तिथली फळं खाल्ली? एकदा अवनीला विचारायचं तरी होतं. अर्थात आपण फक्त पोटभरून खाल्लं होतं. त्याचा साठा करावा असा विचार सुद्धा मनात आला नाही. म्हणजे पुढच्या जेवणाची काही काळजी नव्हती. आपलं पोट ते केवढं? २ - ३ फळं बस झाली. पण आता जर माझ्याबरोबर माझी मुलं असती तर? त्यांना किती सूचना केल्या असत्या. अगदी पावलागणिक... मुलांनो कशाला हात लावू नका बरं का.. अरेरे इथे बसू नका... हे खाऊ नका. कोणास ठाऊक कसलं विषारी फळ असलं तर...सरळ चाला.. अरे वेडा आहेस का तू? वगैरे वगैरे...

पण आपण स्वत:च किती लहान मुलासारखे वागलो. झाडावर चढलो काय.. फांदीवर बसलो काय.. फळं खाल्ली काय... खाली वाकून एकदा तोंडाने तर एकदा ओंजळीने पाणी प्यायलं ते काय.. खरंच. लहानपणी नसतोच कसला विचार. निसर्गाशी हितगुज करण्यात गुंग होऊन गेलेलो असतो आपण.

त्याच्याशी मैत्री अगदी पटकन करून टाकतो आणि त्याच्या सोबत खेळतोही. वाऱ्याच्या वेगाने धावायचं. माश्यासारखं पोहायला बघायचं. फुलांचा रंग आपल्यालाही मिळावा म्हणून पाकळी घेऊन हळूच गालाला चिटकवायचो ते काय. सारी मजाच मजा.

आता माझ्या लक्षात आलं की जादुगार आकाश ने मला माझ्यासोबत कोणतंही सामान नको असं का सांगितलं. त्याने माझी सगळी सोय अगदी व्यवस्थित केली होती. माझ्या मनाला भावलेली अजून एक गोष्ट ती म्हणजे बागेचं. नैसर्गिकरित्या पण अगदी सुबकदार वाटणं. ते जंगल नव्हतं हे नक्की. बगीचाच होता तो. पण त्याला कोणत्याही माळ्यानं आकार दिला नव्हता. हे सगळं इतकं शिस्तबद्धपणे, उत्तम आणि अगदी नैसर्गिकरित्या कसं असू शकेल याचं आश्चर्य वाटलं मला.

आता पुढे काय असेल याची उत्सुकता लागलेली. पवन खरंच उत्तम, जांबाज आणि रुबाबदार घोडा होता. त्याची चाल अत्यंत ऐटदार होती. माझ्या विचारातून भानावर आल्यावर मी त्याच्याकडे पाहिलं. तो अगदी खुशीत दिसत होता. मी मनात म्हटलं, ‘हीच खरी संधी आहे.

हाच तो मौका, स्वाती मार तू चौका. कर दोस्ती पवनशी आणि जाणून घे पुढची सफर.

मी हळूच त्याच्या अंगावरून मायेनं हात फिरवला. तसा तो फुरफुरला. त्याचं अंग एकदम थरथरलं. एक खिंखाळी मी ऐकली. हा म्हटलं आपल्या मनीमाऊचा  कसा मायेनं हात फिरवल्यावर पोटातून गुर्र...गुर्र... असा आवाज येतो आणि म्याँव म्याँव करत आपल्या मांडीवर येते तसाच काहीसा हा घोडा प्रतिसाद देत असावा. त्याने माझ्याकडे एक कटाक्ष टाकला तेव्हा तो मायाळू आहे असं मला जाणवलं.

मग मी त्याला लोणी, मस्का लावायला सुरुवात केली. “पवनदादा, पवनदादा दमलास काय रे तू? आपली स्वारी किती वेळ झालं दौडत आहे. तसा एकदम फ्रेश दिसतोस हा अजूनही. त्या बागेत तुला एकदम लुसलुशीत, हिरवंगार गवत मिळालं असेल नई खायला. बरं मला सांग. आपण अजून किती वेळ असं पळणार आहोत? आपली स्वारी कुठं बरं निघालीये. काही नाव गाव पत्ता ठाऊक आहे की नाही तुला?

त्याने माझ्याकडे वळवलेली मान पुन्हा एकदा सरळ केली आणि टप..टप...टप.. सुरु !!!

काही कळायलाच मार्ग नव्हता. आपण आलोय कुठे. चाललोय कुठे? मगाशी बघितलेली बाग मी या आधी कधीही बघितलेली नव्हती. अगदी पहिल्यांदाच पहात होते आणि

आत्ताचा आजूबाजूचा परिसर सुद्धा माझ्यासाठी अनोळखीच होता.

मग मी विचार करायचं सोडून दिलं. आम्ही ज्या रस्त्यावरून चाललो होतो तो काही डांबरी रस्ता नव्हता. काळी माती आणि दुतर्फा झाडं होती. बरं मातीचा रंगसुद्धा एकसारखा नव्हताच मुळी. कुठे काळी माती, तर कुठे तपकिरी, कुठे पांढरी माती सुद्धा होती. वेगवेगळ्या रंगांची माती, तशी वेगवेगळी झाडं, वेली, दगडं, आणि मोठ्याला शिळा देखील होत्या. दूरवर कुठेतरी पाण्याचा झुळझुळ वाहणारा आवाज येत होता. वारा वाहताना त्याचाही आवाज जाणवत होता. पानांची सळसळ, फुलांचं डोलणं, आणि त्यात आमची सरमिसळ टप..टप...टप..

पुढे तर एक गंमतच झाली. आम्ही ज्या पायवाटेवरून जात होतो त्याच्या एका बाजूला संपूर्ण काळी माती आणि दुसऱ्या बाजूला संपूर्ण तपकिरी (चॉकलेटी) माती होती आणि पवनचे डावीकडचे दोन्ही पाय काळ्या तर उजवीकडचे दोन्ही पाय तपकिरी मातीत होती. आम्ही बरोबर दोन्हीच्या मध्ये होतो. म्हटलं आता आली का पंचाईत. खुद्द बोर्डरवरूनच चालतोय. आता इथे आम्हाला कोणीही हटकायला आलं नाही. ही संपूर्ण पृथ्वी जणू आमच्या दोघांसाठी आहे. आम्ही सर्वठिकाणी फिरू शकतो.

यातली प्रत्येक गोष्ट आम्ही बिनदिक्कतपणे वापरू शकतो. अर्थात फक्त गरजेपुरती. हे अगदी मनापासून सांगतेय. कारण मगाशी आम्ही जेवढी फळ, खाली, पाणी प्यायलो तेव्हा कुठेही अजून पाहिजे अजून पाहिजे अशी (हपापलेपणाची) भावना नव्हती. आमच्या जगात नाही हो चालत असं.

मला जाणवलं, इथे शितल शांतता आहे, एक प्रकारची भयमुक्तता आहे. मला कोणी त्रास देईल किंवा मी कोणाची शिकार होईल किंवा अस्वस्थता असं काहीच वाटत नव्हतं. मला वाटतं जो अनुभव अध्यात्मिक लोकांना येतो एका ध्यानस्थ ऋषींना येतो तसा काहीसा हा अनुभव असावा.

आता शिळा जास्त प्रमाणात दिसायला लागल्या. एक शेवटचा डेरेदार वृक्ष सर्व शिळांनी घेरला गेला होता. आम्ही त्याच्याजवळ थांबलो. मी घोड्यावरून खाली उतरले आणि या वृक्षाला न्याहाळू लागले. तो वृक्ष अगदी मधोमध होता. त्याचा बुंधा खूप मोठा होता. घेरदार, तपकिरी, काळपट रंगाचा. त्याची पानंही काही मोठी तर काही लहान होती. फांद्या अजस्त्र वाढल्या होत्या. इतक्या की कमीत कमी १०० किमीचं अंतर सहज पार केलं जाईल. आपल्या वडाच्या झाडाला असतात तश्या त्याला पारंब्या होत्या. पण त्याचा मधला वरचा भाग खूप उंचच उंच गेला होता.

जणू आभाळाला टेकलाय की काय असा भास होत होता. आपण त्याच्या सावलीत विसाव्यासाठी आरामात बसू शकत होतो. अगदी एखादी छोटी झोपडी असावी असा भाग पारंब्यामुळे तयार झाला होता. क्षणभर मी दचकले. म्हटलं इथे सिंह, वाघ किंवा कोणतातरी अजस्त्र प्राणी बसला असेल तर? मी हळूच वाकून पाहिलं. पण तिथं कोणीही नव्हतं. म्हटलं चला आपली उत्तम सोय झाली. म्हणून मी त्या पारंब्यांनी नैसर्गिकरित्या तयार झालेल्या त्या गुहेत शिरले. आत थोडंस अंधारून आलं होतं. पण मला दिसत होतं. मी आत आत चालत राहिले. काही झालं तरी झाडच होतं ते. पलीकडील बाजूस हे संपेल आणि मी तिथून बाहेर पडेन.

पण ही पारंब्यांची गुहा संपायचं काही नावच घेत नव्हती. मी आता बरीच आत आले होते आणि अंधारही झाला होता. मग मात्र मला खूप भीती वाटू लागली. तेव्हा अचानक जादुगार आकाश ने बोललेले शब्द आठवले. काही वाटलच तर अवनीला हाक मारायची असं सांगून ठेवलं होतं.

“अवनी .. अवनी मला खूप भीती वाटतेय गं. प्लीज ये ना गं तू माझ्यासमोर. अगं मला तसं काहीही नकोय, जेवण, पाणी, कपडे, दागदागिने, पैसे कशाचीही मला गरज नाहीये. मला फक्त

तुझी सोबत हवी आहे. आहेस ना तू माझ्यासोबत? अवनी ... अवनी..

अवनी म्हणजे धरा, पृथ्वी. ज्या धरणीमातेने समस्त प्राणीमात्रांना आपलंस केलंय. जिथे कोट्यावधी श्वास घेतले जातायेत. जी आपलं पालनपोषण अगदी आईच्या मायेने करतेय. ती अवनी. कदाचित मी तिच्याच कुशीत होते सध्या. हा विचार मनात आला आणि क्षणातच माझं भय दूर पळालं. मी तशीच पुढे पुढे जात राहिले. पुढचं पाऊल टाकत राहिले. कारण मला नक्की माहित होतं याला अंत नक्कीच असणार. या गुहेचा शेवट नक्कीच होणार.

# ६.

अंधारातही पौर्णिमेचा चंद्र असावा आणि टपोर्या चांदण्यांचा प्रकाश पडावा. व  हा प्रकाश आपल्याला पुढचं पाऊल टाकण्यासाठी पुरेसा असावा तसं काहीसं जाणवत होतं. मला माझं पुढचं पाऊल दिसत होतं. मी विश्वासानं चालत राहिले. कदाचित मी घाबरून पळून जायचा प्रयत्न केला असता. पण जादुगारच्या शब्दांनी मला धीर दिला होता. अवनी अप्रत्यक्षपणे तुझ्या सोबत आहे. तु काही काळजी करू नकोस. तुला कधीही गरज लागली तर ती नक्कीच तुला मदत करेल. अर्थातच मला कोणतीही वस्तू नको होती. मला त्यांच्या शब्दांनी विश्वास मिळाला व पुढचं पाऊल मी टाकत राहिले. मी किती अंतर चालून पुढे आले हे काही कळलं नाही. आता किती वाजलेत हे ही कळायला मार्ग नव्हता आणि याचा शेवट कुठे असेल? कसा असेल या गुहेतून बाहेर पडल्यावर मी कुठे जाईन? कदाचित याचा शेवट समुद्रात तर होणार नसेल ना? मी सिनेमा मध्ये बघितलं होतं. एखादं मोठं भुयार असतं आणि ते कुठेतरी समुद्रात, किंवा नदीमध्ये निघतं. तिथून बाहेर पडायला वाट असते. पण हे सर्व माझ्या मनातले विचार होते.

आता थोडासा उजेड दिसत होता. गुहा संपत आल्याचं जाणवत होतं. एक मोठी शिळा समोर दिसत होती. ती शिळा अगदी गुहेला लागुनच होती. कसेतरी करून मी त्यावर चढायचा प्रयत्न केला. दोन तीन वेळा खाली पडले. मग थेट शिळेवर न चढता पारंब्यांच्या सहाय्याने थोडक्यात माकडासारखं पारंब्यावर चढत चढत मी त्या शिळेचं टोक गाठलं. हे इतकं सोपं नव्हतं. पण महत्प्रयासानं ते मी जमवलं कारण दुसरा कोणताही पर्याय उपलब्ध नव्हता. मागं फिरावं म्हटलं तर संपूर्ण काळोख पसरलेला. आपण इतक्या अंधारातून आलो या नुसत्या विचारानेच माझ्या छातीत धस्सं झालं.

आपण real life मध्ये नेहमी म्हणतो ना तो काहीही केलं तरी भूतकाळच. एकदा का आत्ताचा क्षण पुढे सरकला की तो भूतकाळात जमा झाला जो आपल्याला परत कधीही कोणत्याही किमतीत परत मिळत नाही. मग उपाय एकच. पुढे चालत राहणे. अर्थात जीवन जगण्याची महत्वाकांक्षा असेल तर. काही strong desire असेल तर. नाहीतर मग काय संपवतातच काही लोक आपलं आयुष्य. असो.

तर त्या उंच शिळेवरून इतकं सुंदर दृश्य माझ्यासमोर दिसत होतं सांगू! वाह !! क्या बात है! जणू संपूर्ण पृथ्वीला मी वरून पाहत

आहे. इतक्या उंचावर मी होते. इतक्या उंचावर म्हणजे गरुड पक्षी जितक्या उंच जाऊ शकतो अगदी तिथंपर्यंत म्हणा ना. मला माझं वजन काहीच जाणवत नव्हतं. अगदी हलकं हलकं. माझ्याजवळ अचानकपणे एक गरुडपक्षी येऊन बसला.

आता माझा सोबती एक गरुडपक्षी होता तर ...

मी त्याच्या पंखांवर कशी बसणार? गरुडाने आपले पंख पसरले मी तयार झाले त्याच्या पाठीवर बसायला. पण त्याने एक उंच झेप घेतली आणि तो तर उडायला लागला. माझ्यासमोरच घिरट्या घालायला लागला. मला काही समजेना. पुन्हा एक दुसरा गरुडपक्षी आला, त्यानेही तसेच केले. पंख पसरले व उंच उडी मारली आणि क्षणातच झेपावला. तो उडायला लागला. मी खूप confuse झाले होते. अरे यार... मला उडायला नाही येत. चालायला येतं, पळायला येतं. उड्या मारायला येतात आणि पोहायलाही येतं पण लेकांनो, मला उडायला नाही रे येत. म्हणूनच तर आमच्या लोकांनी विमान आणि हेलिकॉप्टर शोधून काढलंय ना..

आता हे त्यांना सांगून काय कळणार आहे म्हणा. मी माझे दोन्ही हात पसरून पाहिले. वाह! feeling better… पण उडी मारायचं आणि झेप घ्यायचं काही धाडस होईना. धाडकन पडले

तर जमिनीवर पोहोचू पर्यंत माझ्या हाडांचा एक तुकडाही नीट सापडायचा नाही !!!

आता काय करावं? आधी मी अंगावरचे सगळे दागिने खाली काढून ठेवले. सोन्याचे होते ते पण मला आता त्याचा काहीही उपयोग नव्हता. माझं वजन मला कमी करावं लागणार होतं. मग मी नऊवारी साडीची सहावारी साडी केली. उगी घोळच घोळ होता राव त्याचा. साडीचा वापर जीन्स आणि टॉप सारखा केला. (माझं सर्व कौशल्य पणाला लावून). साडीचंही वजन कमी झालं. आता माझ्याजवळ होता साडीचा उरलेला तुकडा. म्हणजे एक बरंच मोठं कापड आणि काही दागिने. मी साडीचा काठ बाजूला काढला.  मग साडीचा तुकडा, काठ आणि दागिने याचं एक छोटंसं पॅराशूट तयार केलं. पॅराशूटला घट्ट पकडून त्याचा कापडी घोळदार भाग हवेत भिरकावून दिला आणि देवाचं नाव घेऊन एक उडी मारली... अगदी बिनधास्त...

आणि हे काय आश्चर्य!... मी चक्क चक्क हवेत उडत होते. याचं कारण मी खूप उंचावर होते. वाराही जास्त वाहात होता. मला हवेत झेप घेण्यासाठी मदत करत होता. माझ्यासोबत अगदी बरोबरीने तो गरुडही उडत होता. मी  पॅराशूटमधून सगळीकडे एक नजर टाकली. किती सुंदर नजारा होता तो. इतक्या उंचावरून

पृथ्वीकडे बघायचा हा अनुभव एकदम थरारक होता. आता इथे फिरताना मला कोणतीच सीमा नव्हती. या देशातून त्या देशात अगदी सहजपणे मी जाऊ शकत होते. अखंड पृथ्वी भ्रमण करायला मला आता एक वाहन मिळालं होतं. मी पुढे पुढे सरकू लागले. मला खाली दिसत होतं समुद्राचे ते निळेशार पाणी आणि काही भूभाग. कोणताही भूभाग मला स्पष्टपणे दिसत नव्हता. म्हणजे हा भारत हा चीन, हा अमेरिका वगैरे काही काही समजत नव्हते. सारे विश्वची माझे घर याची प्रचीती मला आता येत होती. वर नजर टाकली तर अजूनही वर आभाळ आहे तर. आकाश किती विस्तीर्ण आहे, असीम, अनंत आहे. जिथे नजर जाईल तिथे ढगच ढग दिसत होते. हे दृश्य नजरेनं टिपाव, अवर्णनीय...

थोडं खाली म्हणजे पृथ्वीपासून जवळ, कमी उंचीवरून उडत असताना मला दिसला तो विस्तीर्ण हिमालय, आपल्या सह्याद्रीच्या पर्वतरांगा. काही ठिकाणी धबधबे, दरी खोरे, नद्या, झाडं, मला दिसलं ते विस्तीर्ण पसरलेलं वाळवंट, काही ठिकाणी असलेल्या उंचच उंच इमारती, मोठे मोठे बंगले, शेती, डोंगर, दाट धुके, ढगांमधून पडत असलेला पाऊस मी ढगांच्याही वरून बघत होते.

जमिनीवर फार झंझट असते बाबा, बोर्डर, माझी जमीन, तुझी जमीन, माझं पाणी, माझं शेत.. एका राज्यातून दुसऱ्या राज्यात, एका देशातून दुसऱ्या देशात जाणं म्हणजे सतराशे साठ कागदपत्र, पासपोर्ट, व्हिसा, अन काय काय... इथे कोणी कोणावर रोख लावणारं नव्हतं. सगळं आभाळ आपलंच. या ग्रहावरून त्या ग्रहावर आणि या सुर्यमालेतून त्या सूर्यमालेत, या आकाशगंगेतून त्या आकाशगंगेत जाण्याला कशाला कोण रोखणार आपल्याला? संपूर्ण विश्वभ्रमंतीच करू आपण.

आपणच आपले मालक. हो पण जशी आपली पृथ्वी आपल्याला तिच्यात सामावून घेते तसं दुसरं कोणीही नाही हो थारा देणार आपल्याला. शनी आणि गुरु ग्रह तर लघुग्रह फेकून फेकून मारतील आपल्याला ! बुध तर जाळूनच टाकेल. मंगळाचं तर नावच नको. आपल्या पत्रिकेत असतो तेवढा पुरे आहे. दुसऱ्या ग्रहमालांची काय अवस्था आहे देव जाणे. (देव नव्हे scientist or astronauts जाणे) असे असंख्य वेड्यासारखे वाटणारे विचार माझ्या मनात डोकावून गेले. त्या पेक्षा आपली पृथ्वीच बरी.

# ७.

बरं हे आकाशात असं किती दिवस लटकत राहणार. कधीतरी आपल्याला जमिनीवर यावंच लागेल. आपल्याला जन्म देणारी माता ही जितकी महत्वाची वाटली तितकीच आपल्याला सामावून घेणारी, आपलं संपूर्ण आयुष्य जिच्या अंगाखांद्यावर खेळण्यात जातं त्या धरणीमातेचे महत्व आज आता या क्षणी खूपच जास्त वाटले. आपल्या जन्मापासून ते मृत्युपर्यंतचा आपला हा प्रवास या धरणीवर किती उत्तमरित्या जातो हे कळलं. आपलं आयुष्य हा एक प्रवास आहे आणि ब्रम्हांडात असलेलं पंचतत्व आपली किती काळजी घेत असतं. हे ही आज अधोरेखित झालं. नाहीतर रोजच्या धकाधकीच्या जीवनात, पृथ्वीवर आपण स्थिर आहोत, वाऱ्यामुळे श्वास चालतोय, सूर्यामुळे आपण जगतोय, पाण्यामुळे जगतोय. ज्या गोष्टी अत्यंत महत्वाच्या आहेत त्या आपल्याला आता गौण वाटतायत. पण असं लटकत राहिलं ना की मग कळेल सगळ्याचंच महत्व.

आणि आपण किती कृतघ्न आहोत. ज्या पंचतत्वांमुळे आपण जगतोय त्याच्याच मूळावर उठलोय. पण हा निसर्ग तसा

नाहीये. तो तुम्हाला कुरवाळतो. समज देतो. कित्येक वेळा. पण आपण मानव त्याला समजावून घ्यायलाच तयार नाही हो. असो.

मला खूप छान वाटत आहे हा प्रवास. असं वाटतं कधी संपूच नये हा प्रवास. असंच भटकत राहावं. पण एकदम मनात विचार आला, ‘अरे आपला अभी काय करत असेल बरं? जेवला असेल ना तो. ओंकारच लेक्चर झालं असेल आता. त्याला खायला करून द्यायला हवं. गरम गरम चपाती खूप आवडते त्याला. ओंकार थांब हं आले मी. माझी लेकरं, माझे अहो, माझ्या सासूबाई माझी वाट बघत असतील. मला जायला हवं.’

आणि मी झोपेतून जागी व्हावी तशी खाडकन जागी झाले. बघतेय तर मी आमच्या हॉस्पिटलमधील बेडवर बसले होते. चला मस्त वाटलं, एकदम फ्रेश! जादुगार आकाशचा आवाज आला. काय मग कशी वाटली ही सफर.

ओह हो!!! आपण जादुईदुनियेत प्रवास करत होतो तर. पण माझ्या लेकरांच्या मायेने मी आहे त्या दुनियेत परत आले. प्रवास सुंदर होता. पण तो तेवढ्यापुरतीच बरा आहे.

जादुगार आकाश, या सफरीबद्दल खूप खूप धन्यवाद.

नमस्कार मी आर.जे. माया. धन्यवाद स्वाती, धन्यवाद आकाश आणि अवनी. मला वाटतं ही सफर फारच आनंददायी

होती स्वातीसाठी. या प्रवासातून एक गोष्ट नक्की समोर येतेय. ती म्हणजे आपल्याकडे अफाट संपत्ती आहे. ती म्हणजे हा निसर्ग, ही पृथ्वी, इथल्या सगळ्या नैसर्गिक गोष्टी. ज्या आपलं जीवन सुखकर करतात. निसर्गाच्या हातात हात घालून जर आपण आपला प्रवास केला, निसर्ग नियम पाळले. तर खरंच या जगात कोणीही दुखी होणार नाही.

आता माणसानेच मन आणि बुद्धी यांची योग्य सांगड घालून आपला जीवन प्रवास सुखकर करायला हवा. गरज आणि हव्यास यामधील एक सूक्ष्मरेषा समजून घ्यायला हवी. एकदा का समजली की मानवाला सुखी राहण्यापासून कोणतीच ताकद अडवू शकणार नाही.

आता आपण पुढचे स्वयंसेवक पाहू. पुन्हा एकदा मी आपल्याला नंबर देते यावर कॉल करा आणि बना या माया’ज वर्ल्ड चे पुढील प्रवासी. नंबर सांगतेय 89XXXXXX02.

ट्रिंग... ट्रिंग....ट्रिंग....

हॅलो (तिकडून आवाज) मी चैतन्य बोलतोय. मला माया’ज वर्ल्डचा प्रवास करायचा आहे.

हॅलो मी आकाश, चैतन्य तुमचं हार्दीक स्वागत आहे या कार्यक्रमात. आपण आताच स्वाती यांचे अनुभव ऐकले असालच. काय वाटतं तुम्हाला. तुम्ही उत्सुक आहात या सफरीसाठी.

चैतन्य: हो सर मी स्वाती ताई यांचे अनुभव ऐकले. मला खूपच छान वाटले ते अनुभव. मला वाटतं, नेहमी कशाची तरी भीती आपल्या मनात सतत असते. स्वसंरक्षण, कुटुंबाचं रक्षण, इथं पासून दैनंदिन जीवनातील खूप छोट्या छोट्या गोष्टींची भीती असते. वातावरण तसंच आहे काहीसं. म्हणजे आता कोरोनाचं उदाहरण आपल्या समोरच आहे. या वर्षभरात कित्येक लोक फक्त कोरोना झालाय या भितीने मेलेले आहेत. काही लोक कुटुंबातील सदस्याला कोरोना झालाय आणि त्यासाठी लागणारे पैसे माझ्याजवळ नाहीत म्हणून गेलेत. तर काही मला पण कोरोना झालाय की काय या नुसत्या शंकेने गेलेले आहेत. ही सत्यपरिस्थिती आहे. मानसिकरित्या सगळे खूपच खचले आहेत. कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, सर्वच स्तरावर सामान्य माणूस हतबल झालाय. त्याला काय करावे हेच सुचेनासं झालंय. पण या सफरीमध्ये एक गोष्ट अगदी महत्वाची वाटली ती म्हणजे हा निसर्ग जसं आपलं पालनपोषण करत आहे तसं आपली ही जबाबदारी आहे की त्याची सेवा आपण करावी.

हे असं नातं आहे जसं एका पाल्याचं आपल्या आईवडिलांप्रती असतं.

धरा माझी माय, निसर्ग माझा बाप

मी त्यांचे मायेचे लेकरू

त्यांची अविरत सेवा करू

आपण लहान असतो तेव्हा आईवडील आपली काळजी घेतात. तर मोठे झाल्यावर आपण आईवडिलांची काळजी घेणं अपेक्षित असतं. तसंच आहे हे.

- ***तुम्ही निसर्गाची काळजी घ्या, निसर्ग तुमची काळजी घेईल.***

आकाश: वाह !! क्या बात है | चैतन्य, सर्वांना तुम्ही खूप छान संदेश दिलात या माध्यमातून. धन्यवाद. तर आपली सफर आपण सुरु करायची आहे आणि त्यासाठी तुम्ही तयार असालच. पण याआधी तुम्ही तुमची ओळख सर्वांना करून द्यावी.

चैतन्य: मी एक उद्योजक आहे. प्रवास करायला मला नेहमीच आवडतं. बिझनेसच्या निमित्ताने माझा प्रवास होत असतो. भविष्यात अजून खूप प्रवास  करायचा आहे.

आकाश: तुमची प्रवासाची एक बॅग नेहमीच तयार असावी. तुमचा प्रवास वेगळा असणार आहे. तुमचे अनुभव

नक्कीच वेगळे असणार आहेत. तुम्हाला कोणते वाहन आवडेल आणि तुम्ही कोणता वेष परिधान करणार आहात.

चैतन्य: सर, मलाही माझी सफर यादगार करायची आहे. माझा वेष नेहमीसारखा टी-शर्ट आणि जीन्स हाच पाहिजे आहे आणि वाहन मी तुमच्यावरच सोपवतो. तुम्ही द्याल ते वाहन मी स्वीकारायला तयार आहे.

आकाश: ok.  तर चैतन्य या प्रवासात तुम्ही कोणतेही वाहन घेऊ शकता. ते गरजेप्रमाणे बदलू शकता. ठरल्याप्रमाणेच तुम्ही कोणतीही वस्तू तुमच्यासोबत घ्यायची नाही. चला तर मग सुरु करूयात माया’ज वर्ल्डचा प्रवास.

चैतन्य: ठीक आहे सर. मी तयार आहे.

# ८.

(चैतन्य दार उघडतो आणि समोर असते एक लक्झरी कार, एक सायकल, एक बाईक आणि एक घोडा.)

तशी मला बाईक आवडते पण लक्झरी कार बघून त्यातच बसण्याचा विचार केला कारण ती कार इतकी सुंदर होती. त्याचं डिझाईन इतकं आकर्षक होतं की मी स्वत:ला थांबवू शकलो नाही. मी कार मध्ये बसलो आणि एक आवाज आला, ‘त्रिशूलमध्ये आपलं स्वागत आहे.’ या कारचं नाव त्रिशूल आहे तर. बेस्ट.

घर्र घर्र आवाज झाला. कदाचित स्टार्टअप असेल तिचा. मग एक झटका आणि त्रिशूल वर उंच सरळ रेषेत गेली. प्रथम मी घाबरलो होतो. पण सीट बेल्टची सोय असल्याने मला काही प्रोब्लेम झाला नाही. काही ठराविक अंतर गेल्यावर कार आकाशात स्थिर झाली. बाहेर पाहण्याची सोय होती. अगदी चहुबाजूनी मी बाहेर पाहू शकत होतो. कारण पारदर्शक असं काचेसारखं आवरण त्याला होतं. बाहेरून जरी कार सारखे मॉडेल असले तरी आत फक्त एकच सीट होती. फक्त एकच व्यक्ती त्यात बसू शकत होती. आत बरीच जागा असली तरी कोणतेही मशिन्स

दिसत नव्हते. अंदाजे १० फुट व्यासाचा एक मखमली लाल रंगाचा गोलाकार असा सोफा कम बेड होता. त्यावर मी बसलो होतो. संपूर्ण आरामात. आतलं हवामान आपल्या घरात असतं तसंच नॉर्मल होतं. ना जास्त गरम ना जास्त थंड. कार पूर्णपणे ऑटोमॅटिक चालणारी होती. त्याला steering नव्हते, ब्रेक नव्हता. कोणत्या दिशेला वळवण्यासाठी असं काहीच साधन नव्हतं. या कारचं एक वैशिष्ट्य असं होतं की ही कार जमिनीवर चालत तर होतीच पण ती जमिनीतून, पाण्यावर आणि पाण्यातून शिवाय हवेतही धावणारी होती. म्हणजे एकाच वाहनातून मी कारचा, जहाजाचा आणि विमानाचा अनुभव घेणार होतो. ब्रिलीयंट !!

मग कशी काय हाताळायची ही कार हा प्रश्न मला पडला. माझ्या चेहऱ्यावरचे हावभाव पाहून त्रिशूलमधून एक आवाज आला, “आपल्याला काही हवं आहे का? काही विचारायचं असेल तर विचारा. मी त्रिशूलवाहक आपल्या सर्व शंकांचं निरसन करेन.”

हा आवाज कुठून येत होता काही कळायला मार्ग नव्हता.

चैतन्य: ‘हॅलो, तुम्ही माझ्यासोबत आहात का या कार मध्ये? पण मला तर तुम्ही कुठेच दिसत नाही. कुठे आहात तुम्ही? ही कार कुठून ऑपरेट करत आहात? मी एकटाच आहे का इथे?

त्रिशुलवाहक: मी कोणी व्यक्ती किंवा मानव, सजीव नाही. मी अदृश्य असा रोबोट आहे. या त्रिशूल कारचे सर्व व्यवस्थापन व कार चालवण्याचे काम मीच करत आहे. मी एकाच वेळी अगणित कामं करू शकतो. जगातील सर्व भाषा बोलू शकतो. अगदी कोणतेही काम तुम्ही मला सांगा. माझ्यासोबत तुमचा प्रवास सुखकर होईल. तुम्हाला कोणतीही अडचण येणार नाही. मी तुमचे मन वाचू शकतो. तुमच्या मनात येणारे विचार मला कळतात. तुमच्या नेमक्या गरजा ही मला कळतात. मी All in One आहे. मी प्रचंड ताकदवान असलो तरी नम्र आहे. तुमच्या भाषेत सांगायचे झाले तर जसा श्रीराम भक्त हनुमान प्रचंड ताकदवान असूनही विनम्र होता. श्रीराम यांचा सेवक होता. त्यांनी श्रीराम यांना कधीही दुखावले नाही किंवा त्यांना हानी पोहचवली नाही. तसाच मी आपला नम्र सेवक आहे. या त्रिशूल कारचा वाहक व इथला व्यवस्थापक आहे. आपली आज्ञा पाळणे हे माझे कर्तव्य आहे परंतु आपली आज्ञा जर त्रिशूल व मला हानी पोहचवण्याचे काम करेल त्या क्षणी तुमचा प्रवास रद्द केला जाईल. या कार मधून सन्मानपूर्वक बाहेर काढले जाईल व परत फिरण्यासाठी किंवा प्रवासातून परत तुमच्या घरी जाण्यासाठी तुम्हाला कोणतीही मदत केली जाणार नाही. तेव्हा आपण आपले संबंध मैत्रीपूर्ण ठेवूया आणि या प्रवासाचा आनंद लुटूया. तर चैतन्य तुम्ही तयार आहात का?

चैतन्य: ओ हो. धन्यवाद. मला पूर्ण कल्पना दिल्याबद्दल. (खरं तर खूप भिती वाटली होती त्या क्षणी) मी तर माणूस आहे. माझ्याकडून काही ना काहीतरी चुका होणारच की! (मला या रोबोटने बाहेर फेकले तर?)

त्रिशुलवाहक: नाही नाही, तसं काही नाही. मी तुम्हाला उगीचच बाहेर फेकणार नाही. जोपर्यंत तुम्ही आमच्यासाठी सुरक्षित, तोपर्यंत तुम्ही सुरक्षित.

मी विसरलोच होतो की हा रोबोट माझ्या मनातले विचारही ओळखू शकतो ते. मग मी ठरवलं या रोबोटशी मैत्री करायची.

(रोबोट गालातल्या गालात हसल्यासारखा मला भासला.)

आता आमचा प्रवास सुरु झाला. आमचा हवाई प्रवास सुरु होता. निळेशार ढग, उंच उडणारे विविध पक्षी, वरून खाली पृथ्वीकडे बघितल्यावर तिचे खुलून दिसणारे सौंदर्य, वाह!!! क्या नजारा है! आम्ही आकाशातून एका पर्वताच्या शिखरावर गेलो. पर्वत ही खूप उंच होता, मला तो एव्हरेस्टपेक्षाही उंच भासला. त्रिशूल त्याच्या भोवती गोलाकार घिरट्या घेत खाली खाली येत होता. मला त्याचे सौंदर्य चहूबाजूंनी न्याहाळता यावे म्हणून या गोलाकार घिरट्या सुरु होत्या. नाहीतर एका दमात एका क्षणात

आम्हाला पायथ्याशी येत आले असते. खाली त्या पर्वताच्या पायथ्याशी एक भलं मोठं भूयार होतं. ज्याला आपण गुहा म्हणतो. आम्ही गुहेतून आत शिरलो. गुहेतून आमची कार अगदी सहजपणे चालली होती. मला कारच्या वेगाचा काहीच अंदाज येत नव्हता. कारण मला काही जाणीव होत नव्हती. म्हणजे अगदी सहजपणे मी आतल्या आत इकडे तिकडे वावरू शकत होतो. भुयारातून जाताना पाहण्यासारखं काही होतं का? पहिल्यांदा मला वाटलं की आत अंधार असावा. भुयारच ते, म्हणजे अंधारच असणार. रेल्वे ने प्रवास करताना लागतात ना आपल्याला बोगदे अगदी तसं. पण माझा अंदाज चुकला होता.

भुयारातून मला दिसले ते छोटे छोटे पाण्याचे झरे, आत काही नाजूक वनस्पती होत्या. त्याला अगदी छोटी छोटी फुलं होती. काही चकाकणारे दगड होते. ते हिरे तर नसतील ना? त्याची चकाकी इतकी होती की सूर्याची कमी ते पूर्णपणे भरून काढत होते. आतला भाग प्रकाशमय होता. अर्थात हे दगड सलग नव्हते. मध्ये मध्ये काही वेगळ्या आकाराचे व रंगाचे दगडही होते. पण हे सर्व दगड चकाकत होते. त्यामुळे प्रकाशही रंगीत होता. जणू काही लायटिंगच केली असावी. हे सर्वकाही निसर्गनिर्मित होते याचे विशेष वाटले. हा प्रवास संपूच नये असं वाटलं. कारण मी कधीच

असे दृश्य पाहिले नव्हते. एक दोन सेकंद मला त्या दगडांचे निरीक्षण करण्यास वेळ मिळाला आणि आमचा प्रवास सुरु झाला.

इतक्यात कुठूनतरी पाण्याचा खळखळ आवाज ऐकू आला. समोर काहीतरी थक्क करणारं दृश्य मला दिसलं. आम्ही चक्क चक्क एका अथांग समुद्राच्या मध्यावर होतो. आम्ही त्या भुयारातून बाहेर आलो ते एक बेट होतं. मी कार मधून बाहेर आलो. एक दीर्घ श्वास घेतला.

वाहवा !!! अथांग समुद्र, त्या लाटांचा आवाज, वाहणारा वारा, बेटावर असलेल्या वनस्पती, नयनरम्य असा तो देखावा होता.

माझं मन, एकदम शांत, स्थिर आणि आनंददायी होतं. मनात खूप खोलवर एक आनंदाची लाट उसळली. इथे अगदी लहान मुलासारखं ओरडलो. हर्षोल्हासात उड्या मारल्या. नाचलो. एक पार्टी सॉंग ऐकू आलं आणि मी आता मस्तपैकी नाचत होतो एकटाच. भरपूर आनंद घेतला. माझ्याप्रमाणे सूर्यही तितकाच आनंदी असला पाहिजे, हा महासागरही तितकाच आनंदी असला पाहिजे असं वाटलं आणि त्यांच्याकडे पाहून एक छोटीशी कविता सुचली ती अशी,

आतुरलो मी पाहण्या देखणे प्रतिबिंब माझे,
ते तेजोमय सुवर्णरंगीत सूर्यबिंब माझे.
हर्षलो, उसळलो मी लाटांवर स्वार जाहलो,
खळाळला तो सागर माझे बालरूप पाहुनी.
मध्येच चिमण्या माश्यांचे ते उंच उंच ऊछलणे,
हळूच माझे रूप गोंडस क्षणिक न्याहाळणे.
मी होऊन हर्षित आणिक नटलो, आणिक शृंगारलो,
उधळली नभी मुक्त हस्ते ती पिवळी केशरी फुले
पित-केशरी उधळण पाहून जग सारे आनंदले
हे जग सारे आनंदले



मग पुन्हा कारमध्ये बसून आम्ही पुढे निघालो. आम्ही त्या बेटावर फार वेळ थांबलो नाही. आता समुद्रात खोल पाण्यातून आमची कार चालली होती. काही समुद्री वनस्पती तळाशी होत्या. माझ्या आजूबाजूला खूप लहान मोठे मासे, वेगवेगळे समुद्री जीव पोहताना दिसत होते. इतक्या वेगवेगळ्या प्रजातीचे जीव इथे इतक्या खोलवर राहतात हे बघून आश्चर्याचा धक्का बसला. पाणी म्हणजे मासे, हे इतकंच सूत्र आम्हाला माहित होते. पण माझाच माझ्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. इतके वेगवेगळ्या आकाराचे, रंगाचे ते समुद्री जीव पाहून खूप खूप छान वाटले. आजपर्यंत कधीही न पाहिलेले व न ऐकलेले असे जीवन पाण्याखाली या अथांग समुद्राच्या नव्हे महासागराच्या कुशीत किती निवांतपणे जीवन जगत आहे! आमच्या कारच्या जवळून ते जात होते. पण आमच्याकडे कोणाचंही लक्ष नव्हतं.  ते आपापल्या नादात निवांत जलविहार करत होते.

मनात आलं की जसे आम्ही त्यांना पाहू शकतो तसे ते आम्हाला पाहू शकतात का? मी माझी शंका त्रिशुलवाहकला विचारली. त्याने मला सांगितले की आम्ही कोणालाही दिसू शकत नव्हतो. अगदी अदृश्य होतो आम्ही. म्हणूनच आम्हाला कोणत्याही प्राण्यापासून धोका नव्हता. आम्हीही त्यांना कोणतीही हानी पोहोचवू शकत नव्हतो. त्यांना हात लावू शकत नव्हतो.

कारण कारच्या बाहेर आम्हाला जाता येत नव्हतं. कार त्रिशूलमध्ये काही गोष्टी सेट केलेल्या होत्या. प्रवासाचा मार्ग, त्याची निश्चित थांबायची ठिकाणे आणि परत फिरण्याचा प्रवास हे सर्व काही सेट होते. हा एक प्रवास आहे तो फक्त डोळ्यांनी बघून मनात साठवून ठेवायचा होता. आम्ही या निसर्गनिर्मित सृष्टीमध्ये कोणताही हस्तक्षेप करणार नव्हतो. काही कारणच नव्हते तसे करायचे.

अच्युत गोडबोले यांच्या किमयागार पुस्तकातून बरीच माहिती वाचली होती. किमयागार मध्ये पाण्याखाली असलेल्या जमिनीचे वर्णन होते. ते वाचत असताना मी थक्क झालो होतो. आज मात्र त्रिशूलमधून मी स्वत: हे सर्वकाही पहात होतो. आम्हाला त्रिशूलमध्ये इतकं कम्फर्ट वाटत होतं की, ना ऑक्सिजनची कमी ना भूक लागत होती. खरं तर बाहेरचं रम्य जलावरण पाहून तहानभूक विसरून गेलो होतो. मी मनातल्या मनात विचार केला आपणही अशी कार बनवायची. त्याचे पेटंट घ्यायचे. सर्व जगभर या कार विकायच्या. मला किती पैसे मिळतील नाही !!! अब्जाधीश होईन मी. ही कार विकत घेण्यासाठी लोक वेडे होतील अक्षरश:! लोकांच्या रांगा लागतील माझ्या कंपनीपुढे !!! मी एक बदल मात्र करेन. आता ची ही कार फक्त एकाच व्यक्तीसाठी आहे. मी माझ्या पूर्ण कुटुंबासाठी ती तयार करेन.

म्हणजे सर्वांना एकत्र प्रवास करता येईल. एकत्र प्रवास करण्याची मजा काही औरच.



# ९.

त्रिशूलवाहक: हा.. हा.. हा.. चैतन्य, आता खरा उद्योजक शोभतोस बघ. तरीच म्हटलं अजून बिझनेस, पैसा, श्रीमंती याचा विचार कसा काय डोकावला नाही तुझ्या मनात? आतापर्यंत निसर्गाच्या किमयेने तू त्या जादुई दुनियेत रममाण झाला होतास. पण सवयीप्रमाणे नफा व तोट्याचं गणित सुरु झालं तुझ्या मनात. पण माझी एक विनंती आहे. सध्या या सर्व विचारातून बाहेर ये आणि ज्या सद्य परिस्थितीत तू आहेस त्याचा आस्वाद घे. या गोष्टी तुला परत कधीही पाहायला मिळणार नाहीत. आताचा प्रत्येक क्षण तुझ्यासाठी मोलाचा आहे. हा क्षण आवर्जून जग. बघ, बघ जरा तुझी नजर वळवून तिकडे काय आहे ते?

मी थोडा गोंधळून नजर वळवतो तर काय? आम्ही परत वर बेटावर आलो होतो. माझ्यासाठी झकास मेजवानीचा बेत केला होता. अहाहा, काय सुंदर जेवण होतं ते! व्हेज नॉनव्हेज दोन्ही प्रकारचे जेवण तयार होते. मी मस्त ताव मारला जेवणावर. सुंदर संगीत वाजत होते. काही नवी धून ऐकू येत होती. समुद्राच्या लहरींची असावी. परत सोफ्यावर येऊन बसलो ते मला झोप कधी

लागली कळलच नाही. जेव्हा जाग आली तेव्हा मी माझ्या स्वत:च्या घरातील बेड वर होतो. अरे, ती त्रिशूल कार कुठे आहे? तो त्रिशुलवाहक कुठे गेला? त्यांनी मला सुखरूपपणे माझ्या घरी सोडले होते.

वाह क्या बात है! माया'ज वर्ल्ड चा प्रवास अगदी मस्त झाला. धन्यवाद आकाश आणि अवनी.

ही फँटसी दुनिया प्रत्येकाला एकदा का होईना अनुभवायला मिळावी अशी मी आशा करतो.

माया: नमस्कार, मी आर. जे. माया. आपण सर्व जण ऐकत आहात चैतन्य यांचा माया'ज वर्ल्ड मधील हा थरारक प्रवास रेडिओ एफ.एम. माझी दुनिया ९९९.९९ वर. धन्यवाद चैतन्य.

आपले स्वयंसेवक प्रत्यक्षात हा प्रवास अनुभवत आहेत आणि तुम्ही त्यांचा प्रवास फक्त ऐकून अनुभवत आहात. कसा वाटला आमचा उपक्रम आम्हाला जरूर कळवा. पण त्याआधी जादुगार आकाश मी तुम्हाला विनंती करते की कसं काय शक्य झालं हे सर्व? म्हणजे चैतन्य किंवा स्वाती कधीही अशा दुनियेत गेले नव्हते. त्यांनी कशी काय अनुभवली ही दुनिया. माया'ज वर्ल्ड ची कन्सेप्ट कशी सुचली?

आकाश: खरं सांगू का, मला माझ्यात जे कसब आहे त्याचा कस पहायचा होता. म्हणजे जादू ही बघता येते. ती एक हातचलाखी आहे. हे सर्वांनाच माहित आहे. तुम्ही बऱ्याच जणांनी माझी पुस्तकं वाचली असतील तर त्यातील प्रत्येक जादू कोणीही करून बघू शकतो. स्वत: जादुगार होऊ शकतो. त्यासाठी लागणारे परिश्रम, मेहनत जो कोणी घेईल तो नक्की एक महान जादुगार म्हणून प्रसिद्ध होईल. आजपर्यंत मी जितके प्रयोग केलेले आहेत ते सर्व प्रयोग मी पुस्तकाद्वारे सर्वांसमोर मांडतो.

माया: तुम्हाला भीती नाही का वाटत की ही जादू शिकून कोणीतरी तुमची जागा घेईल आणि तुमच्यापेक्षा वरचढ होईल.

आकाश: असं काही नसतं. ज्ञान दिल्याने ज्ञान वाढते असं आपल्याला शिकवलंय. आपले शालेय शिक्षक असू देत किंवा कॉलेजमधील शिक्षक असू देत ते आपल्याला ज्ञान देतातच ना. ते थोडी असा काही विचार करतात. मला जे कमवायचं होतं ते मी कमवलं. पैसा, प्रसिद्धी सर्व काही आहे. आता जर माझे ज्ञान माझ्याबरोबर संपले तर ते खूप नुकसानकारक आहे. त्या पेक्षा नवे जादुगार तयार व्हावेत. त्यांनी स्वत:चे काही नवीन प्रयोग करावेत आणि लोकांचे मनोरंजन करावे. माझे स्वत:चे प्रयोग सतत चालू असतात. मी नवनवीन जादूचे शोध घेत असतो. काहीतरी

भव्यदिव्य लोकांना सुखावून जाईल असं काहीतरी करण्याची आस मला नेहमीच असते आणि या प्रयोगातूनच हा माया’ज वर्ल्ड चा प्रोजेक्ट हाती घेतला.

लॉकडाऊन चा काळ सुरुवातीला थोडा सुखकर होता. म्हणजे पहिला आठवडा एकदम छान वाटलं. पण नंतर नंतर प्रत्येकाची चुळबुळ सुरु झाली. प्रत्येकाचे हात शिवशिवत होते. पाय एका जागी ठरत नव्हते. लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकाची हालत थोड्याफार फरकाने अशीच होती. तेव्हा माझ्या मनात हा माया’ज वर्ल्ड चा प्रयोग डोक्यात आला. ही कन्सेप्ट डोक्यात आली.

फँटसी म्हणजे लोकांना दुसऱ्या दुनियेत घेऊन जाणं. कल्पनारम्य वातावरण निर्मिती करणं आपण खरोखरच त्या वेगळ्या विश्वात आहोत असा आभास निर्माण करणं हा या माया’ज वर्ल्ड चा उद्देश. म्हणजे बघा तुम्ही जेव्हा एखादा सिनेमा बघता किंवा एखादी सिरीयल बघता तेव्हा हेच करत असता. पूर्णपणे त्या विश्वाचा आपण एक घटक आहोत अशी एक भावना सिनेमा किंवा सिरीयल पाहताना निर्माण होते.

मला तसंच काहीसं करायचं होतं. पण फक्त अडचण ही होती की कोणतेही दृश्य तुम्हाला समोर दिसणार नाहीये. नाहीतर हे

सर्व मी एखाद्या टीव्ही चॅनल वर दाखवू शकतो. पण माझ्या या प्रयोगामध्ये मला लोकांना आपल्या कल्पनाशक्ती द्वारे एक कल्पनारम्य ठिकाण तयार करून त्या ठिकाणी घेऊन जायचे होते. जणू काही आपण त्याचाच एक भाग आहोत असे वावरायचे आहे तेही  मानसिकदृष्ट्या. प्रत्येकाला दैवाची देणगी आहे. प्रत्येकजण कल्पना करू शकतो. मी फक्त हिप्नोटाईझ करून त्या व्यक्तीला आपल्या कल्पनाशक्तीला प्रवृत्त करण्याचे काम करत होतो. अर्थात कोणतीही व्यक्ती फक्त प्रवास हा एकच मुद्दा घेऊन त्यानुसार कल्पना करेल आणि आपल्या त्या कल्पनारम्य परिसरात हरवून जाईल. इतकंच मला करायचं होतं.

ज्या दोन व्यक्ती आपण स्वयंसेवक म्हणून या कार्यक्रमात घेतल्या त्यांना व्होटसप द्वारे मी कोणत्या दुनियेत जाणार आहात या बद्दलची कल्पना दिली. म्हणजे त्यांची चित्रे पाठवली. ती चित्रे त्यांच्या समोर होती व त्यांचा प्रवास सुरु झाला. हे सर्व एखादा सिनेमा पहिल्यासारखंच आहे. फक्त इथे तुम्ही पहात नव्हता तर ऐकत होतात. बस.

चैतन्य आणि स्वाती यांनी तो प्रवास आपल्या कल्पनाशक्तीने अनुभवला. त्या स्वप्ननगरीत ते इतके एकाग्र झाले होते की दोघेही तिथल्या बारीकसारीक गोष्टी टिपत होते. ते

आपल्यापर्यंत पोहोचवत होते. तिथलं अप्रतिम सौंदर्य आत्म्याला तृप्त करणारं होतं ते आपण सर्वांनीच अनुभवलं. मला वाटतं नकळत का होईना हा कार्यक्रम ऐकणारी प्रत्येक व्यक्ती ही सफर आपल्या मन:चक्षुनी अनुभवत होती. मनाची ही शक्ती अदभूत आहे.

यातून आम्ही काय साध्य केलं तर माणसाला आलेली मरगळ बाजूला केली. कोणीही आपापल्या रम्य ठिकाणी जाण्याची मनात कल्पना करू शकतो आणि मनाने तिथे पोहोचू शकतो. ते जग बघू शकतो. इथे कोणालाही धोका नाही कारण या सर्व फक्त मनातल्या कल्पना आहेत. त्या आपल्या मनापासून सुरु होतात आणि मनातच संपतात.

या निमित्ताने अजून एक हेतू साध्य होतो तो म्हणजे लोक कल्पना करायला सुरु करतील. काहीतरी वेगळं पहायची इच्छा त्यांच्याही मनात निर्माण होईल. आणि प्रत्येक जण एका वेगळ्या अनोख्या दुनियेत फेरफटका मारून येईल. मन ताजंतवानं करण्याचा हा एक उत्तम मार्ग आहे.

कोण जाणे यातून काहीतरी नवनिर्माण ही होऊ शकतं. जसं की त्रिशूल कार ची कन्सेप्ट. काहीशी वेगळी हटके. एखादा इंजिनियर, शास्त्रज्ञ, किंवा डॉक्टरच नाही तर कोणीही सामान्य व्यक्ती यांच्या कल्पकतेने काहीतरी नवं निर्माण होऊ शकेल.

निसर्ग नियम म्हणा किंवा निसर्गाचं एक गुपित म्हणा, कल्पनाशक्ती ही मानवाला मिळालेली देणगी आहे. स्वप्न पहाणं, मनातल्या मनात आनंदी कल्पनांमध्ये रमून जाणं ही कोणत्याही भव्यदिव्य यशाची एक सुरुवात असते. लागलेला प्रत्येक शोध, हा आधी त्या माणसाच्या मनात कल्पनेत त्याने पाहिलेला असतो. मगच तो प्रत्यक्षात येतो. ज्या वेळेस माणूस आपल्या कल्पनाशक्तीला चालना द्यायला सुरु करेल त्या वेळी जगात असलेल्या खूप साऱ्या अडचणी चुटकीसरशी संपतील. कल्पनाशक्तीसाठी गरज आहे ती मनाच्या एकाग्रतेची. एकदा का एकाग्रता आणि कल्पनाशक्ती यांचा मिलाप झाला की मग कितीही मोठ्यात मोठं संकट असलं तरीही मानव या संकटातून बाहेर पडू शकतो किंवा स्वत:ला सुखी आणि समाधानी बनवू शकतो.

आकाश: मला वाटतं आपण हा कार्यक्रम करत असताना काही लोकांना एक अनुभव आला असेल. की स्वयंसेवकानी त्यांचे जे दृश्य आपल्या समोर उभे केले त्यावेळी हे सर्व ऐकत असणारे लोक आपल्या कल्पनाशक्तीने आपापल्या हव्याशा काल्पनिक दुनियेत ही सफर करून आले असतील. हो नक्कीच. प्रत्येकाची आवड वेगळी, प्रत्येकाचे स्वभाव वेगळे. वय वेगळं. म्हणजे आपला स्वभाव, आवड, स्वप्न, वय, स्त्री अथवा पुरुष,

यानुसार प्रत्येकाची सफर वेगळ्या दुनियेत होऊ शकते. प्रत्येकाचा अंतिम हेतू फक्त आनंद मिळवणे हाच असतो.

मला हेच सांगायचं आहे. की कल्पनेतूनच नवी दुनिया उभी राहू शकते. त्यासाठी स्वत:च्या मनात डोकावून बघितलं पाहिजे. स्वत:च्या intellect ला जरा जागं केलं पाहिजे. मन आणि बुद्धी जेव्हा एकत्र येतात तेव्हा अद्भुत असे चमत्कार घडतात.

आपण फक्त इतकंच करायचं आहे की निसर्गाचा नियम पाळायचा आहे. आपण निसर्गाचा एक खूप छोटासा घटक आहोत. हजारो, लाखो, कोट्यावधी प्रजातींपैकी मानव ही एक प्रजाती या पृथ्वीवरील एक घटक आहे.

तुम्ही म्हणाल माणूस हा बुद्धिमान प्राणी आहे. तो चिकित्सक आहे. आपल्या आजूबाजूला असलेल्या गोष्टींचा विचार करणे, ती अशी का हे तपासून पाहणे, वेगवेगळे प्रयोग करून पाहणे, त्याचा मानवाला होणारा उपयोग वगैरे वगैरे आणि मग त्यातून नवे शोध नवे प्रोडक्ट, नव्या सुविधा आपल्याला मिळत जातात. पण...

हे सर्वकाही आपल्यासाठीच आहे. सारी पृथ्वी आपलीच तिथे असलेले सर्वकाही आपलेच, इथली जमीन माझी, झाडं माझी, कारखाने, पैसे सर्व काही माझं माझं माझं... मी या जगाचा राजा,

राजांचा राजा आहे आणि म्हणून या संपूर्ण पृथ्वीवर इथल्या प्रत्येक वस्तूवर माझाच जणू काही हक्क आहे अशी जी धारणा झालीये ना मानवाची ती सगळी इथे गळून पडते.

पृथ्वीवर असलेल्या प्रत्येक घटकासारखे आपणही तिचे एक घटक आहोत. जन्माला आलो तसे मरणही अटळ आहे. कळी उमलते फुलते आणि संध्याकाळी कोमेजून जाते. दुसऱ्यादिवशी गळून पडते. प्रत्येक अस्तित्वाचा काळ ठरलेला आहे कोणी जास्त दिवस, महिने, वर्ष जगते तर कोणी काही तास. प्रत्येकाचा हिशेब इथे आधीच करून ठेवलाय. पण आपली चिकित्सकवृत्ती, त्याहीपेक्षा खरं सांगू जगण्याची, अमर होण्याची केविलवाणी धडपड आपल्याला गप्प बसू देत नाही. आपल्यातली मत्सर, द्वेष वृत्ती आपल्याला गप्प बसू देत नाही. आपल्यातला लोभीपणा मरेपर्यंत संपत नाही. आपल्याला प्रगत व्हायचं आहे आणि खूप खूप प्रगत व्हायचं आहे. इतकं इतकं इतकं प्रगत व्हायचं आहे की या ग्रहावरून त्या ग्रहावर असं जाता यावं जसं की भारत ते अमेरिका केलेला विमान प्रवास. आपल्याला पृथ्वीवरची जमीन पुरेशी नाहीये. परग्रहावरच्या जमिनी विकत घ्यायला जायचं आहे आपल्याला. कोण जाणे या पृथ्वीने धोका दिला तर? कोण जाणे पृथ्वी नष्ट झाली तर? कोण जाणे ... काय काय नी काय काय प्रश्न आणि ते ही सगळे आपला विनाश होणार आहे मग त्याआधी

काहीतरी केलं पाहिजे. तिकडे काय हिमनद्या वितळायला लागल्यात आता जगबुडी लवकरच होणार??? असले काहीतरी विचित्र आडाखे बांधतोय आपण आणि खूप घाबरून काहीतरी विचित्रच करत बसलोय.

कारण एक नियम कसा आहे की स्वसंरक्षण करायचं असेल तर दुसऱ्याला मारलं पाहिजे त्यानं वार करण्याआगोदर.

निसर्गही आता म्हणायला लागलाय बाबानो, हात टेकले रे तुमच्यासमोर. मी नाही वाचवू शकणार तुम्हाला. तुमच्या विनाशाला तुम्हीच कारणीभूत आहात. बुद्धीचा वापर तुम्ही सर्वात जास्त वाईट कामासाठीच केलात. भोगा आता आपल्या कर्माची फळं.

यासारखं काही होऊ नये. याची काळजी आपणच घ्यायची आहे. कारण आपण निसर्गाचा एक खूप खूप शुल्लक घटक आहोत. आपल्या कल्पनाशक्तीचा उपयोग मानवकल्याणासाठी करत असताना निसर्गाला धोका पोहोचणार नाही याची काळजी मात्र प्रत्येकाने घ्यायला हवी. मग हे जग अजून सुंदर बनेल. ही पृथ्वी आपल्यावर भरपूर प्रेम करेल. आपण तिचा आदर करूयात. ती ही आपला आदर करेल.

रेडीओ एफ.एम. माझी दुनिया यांनी मला हा कार्यक्रम करायची अनुमती दिली याबद्दल मी त्यांचे शतश: आभारी आहे. धन्यवाद.

माया: खूप खूप धन्यवाद. जादुगार आकाश आणि अवनी. आपण इथे आलात आम्हाला आपल्या विशेष प्रयोगातून अगदी मनमोहक अशी सफर घडवून आणलीत आणि सर्वांना उत्तम असा संदेश दिलात त्याबद्दल आपले आभारी आहोत. आपली पुन्हा या सेटवर भेट होईल आणि काही नवीन प्रयोग घेऊन तुम्ही पुन्हा एकदा रेडीओ एफ.एम. माझी दुनिया या सेट वर याल अशी आशा करते. धन्यवाद.

तर हा कार्यक्रम ऐकणाऱ्या सर्व चाहत्यांचे खूप खूप आभार. या कार्यक्रमाची आपण सांगता करत आहोत. पुन्हा भेटूया. पुढच्या रविवारी. ठीक सकाळी ६ वाजता. आर. जे. माया सोबत रेडीओ एफ.एम. माझी दुनिया या कार्यक्रमामध्ये.

(कार्यक्रम संपतो.)

****समाप्त***

साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे आरसे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या.

साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धी नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव

www. esahity. com

esahity@gmail. com